# प्रात्यक्षिक ३ : (अ) संदर्भ ग्रंथांवर/साधनांवर आधारित प्रात्यक्षिक

**संदर्भ सेवेतील संदर्भ साधनांचे महत्त्व :** वाचन साहित्याचा जास्त वापर होण्यास संदर्भ सेवेची आवश्यकता आहे. वाचकांच्या दैनंदिन व विशिष्ट माहितीविषयक गरजांचे समाधान करण्यासाठी संदर्भ ग्रंथांचा उपयोग केला जातो. वाचकास असलेले विषयांतर्गत निगडीत प्रश्न जसे, शब्दांचे अर्थ, विषयाची सामान्य माहिती, महत्त्वाच्या घटना, भौगोलिक स्थळांची माहिती, संख्यात्मक बाबींवर आधारित माहिती इत्यादी संदर्भ ग्रंथांतून पुरवली जाते. यासाठी संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध असावेत. जसे शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्रकोश, भौगोलिक साधने, वार्षिके, सूचीय साधने, अहवाल इत्यादी. संदर्भसेवांचे दोन प्रकार आहेत : (१) शीघ्र संदर्भ सेवा (२) विलंबित संदर्भ सेवा.

शीघ्र संदर्भ सेवा व विलंबित संदर्भ सेवा विविध संदर्भ ग्रंथांच्या साहाय्याने दिल्या जातात. प्रात्यक्षिकाअंतर्गत विविध संदर्भ साधने व त्यांच्याविषयीची माहिती थोडक्यात पुढे दिलेली आहे. संदर्भ साधनांची उदाहरणे घेऊन त्यांचा ग्रंथालयात प्रत्यक्ष संदर्भ सेवा देताना कसा उपयोग करता येतो याविषयी या घटकात माहिती दिलेली आहे. या संदर्भग्रंथांच्या आधारे काही स्वाध्याय नमूद केले आहेत जे प्रात्यक्षिक परिक्षेत विचारले जातील. संदर्भ ग्रंथांच्या माहितीच्या आधारे प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाईल.

साधारणपणे कोणत्या प्रकारची माहिती अथवा संदर्भ प्रश्नाचे उत्तर मिळवण्यासाठी कोणत्या प्रकारचा संदर्भ ग्रंथ वापरावा हे संदर्भ प्रश्नाच्या स्वरूपावर अवलंबून असते. संदर्भ ग्रंथाचे खालील मुख्य प्रकार प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवडले आहेत.

(१) शब्दकोश

(२) ज्ञानकोश

(३) वार्षिके

(४) चरित्रकोश

(५) भौगोलिक साधने/स्थलवर्णन कोश

(६) सूचीय साधने

(७) निर्देशिका

वरील संदर्भ ग्रंथांच्या प्रकारांतर्गत येणारी काही संदर्भग्रंथ/साधने खाली वर्णिलेले आहेत.

**(१) शब्दकोश :** भाषांमध्ये वापरले जाणारे शब्द, शब्दांचे अर्थ, उच्चार, शब्दांचे व्याकरणातील स्थान, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द अशा प्रकारची माहिती मिळवण्यासाठी शब्दकोश हा महत्त्वपूर्ण संदर्भ ग्रंथ आहे. शब्दकोशांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

**(i) ऑक्सफर्ड ॲडव्हान्सड् लर्नर्स डिक्शनरी ऑफ करंट इंग्लिश** (१०वी आवृत्ती) संपादक : ए.एस. हॉर्नबी, प्रकाशक : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

स्वरूप व व्याप्ती : इंग्रजी भाषेत उपयोगात आणले जाणारे शब्द या कोशात समाविष्ट केलेले आहेत. शब्दांची रचना इंग्रजी वर्णक्रमानुसार (alphabetical) केलेली आहे. शब्दाविषयी माहिती देताना त्याचा उच्चार, वर्णरचना, व्याकरणातील त्याचे स्थान व विविध संदर्भात त्याचा अर्थ व वाक्यात उपयोग दिलेला आहे.

हा शब्दकोश ठरावीक कालांतराने अद्ययावत स्वरूपात प्रकाशित होत असतो. या शब्दकोशाच्या दहाव्या आवृत्तीत साधारणतः साठ हजार शब्द, ७९ हजार वाक्प्रचार (phrases) आणि एक लाखाहून अधिक उदाहरणांद्वारे शब्दांचे अर्थ स्पष्ट केले आहेत. शब्दकोशाच्या सुरुवातीस शब्दकोशाच्या वापरासंबंधीचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

**(ii) ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी** – २० खंड, २री आवृत्ती, १९८९ (१९९१ पुनर्मुद्रण), संपादक : जे.ए.सिम्प्सन.

स्वरूप व व्याप्ती : या शब्दकोशाची पहिली आवृत्ती १८८४ ते १९२८ या दरम्यान प्रकाशित झाली. त्यानंतर १९८९ मध्ये दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन झाले.

सध्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाची तयारी चालू आहे.

सर्व इंगजी शब्दांची ऐतिहासिक माहिती या कोषात समाविष्ट केलेली आहे. कालागणिक कोणत्या वर्षी शब्द अस्तित्वात आला व त्याच्या उच्चारात आणि अर्थात कसा बदल होत गेला याविषयीची माहिती समाविष्ट आहे. या शब्दकोशात साधारण ५ लाख शब्दांचे अर्थ, त्यांचे उच्चार, २,५०,००० शब्दांची उत्पत्ती विषयक माहिती व २,४०,००० उदाहरणे (illustrations) आणि २४ लाख अवतरणे (Quotations) समाविष्ट केलेली आहेत. या शब्दकोशाचा उपयोग विद्यार्थी, शिक्षक, ग्रंथपाल, भाषा अभ्यासक यांना मोठ्या प्रमाणात होतो.

**(iii) आदर्श मराठी शब्दकोश,** संपादक : प्र.न.जोशी, तिसरी आवृत्ती, २०१५, प्रकाशक : विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे.

मराठी भाषेतील हा एक उत्कृष्ट शब्दकोश होय. या शब्दकोशाची प्रथम आवृत्ती, १९७० मध्ये प्रकाशित झाली. तद्‌नंतर १९९२ पर्यंत या शब्दकोशाच्या तीन आवृत्त्या प्रकाशित झाल्या. या शब्दकोशात सुमारे ८०००० शब्दांचे अर्थ, शब्दाचे व्याकरणातील स्थान, व्युत्पत्ती इत्यादी माहिती समाविष्ट केलेली आहे.

**(२) ज्ञानकोश :** ज्ञानकोशास ज्ञानाचे भांडार असे संबोधले जाते. ज्ञानविश्वातील उपलब्ध माहिती ज्ञानकोश निर्मिती करताना विचारात घेतली जाते व विविध विषयातील संज्ञा, संकल्पना, तत्त्वे, सिद्‌धान्त आणि नियम यांचे व्याख्यांसह स्पष्टीकरण ज्ञानकोशात दिले जाते. थोडक्यात, वाचकांच्या विविध माहितीविषयक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने ज्ञानकोशाची निर्मिती केली जाते. काही महत्त्वपूर्ण ज्ञानकोशांची माहिती पुढील भागात वर्णन केली आहे.

**(i) द न्यू एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका :** प्रकाशक : ब्रिटानिका इनकॉर्पोरेशन, शिकागो, १९९४, ३२ खंड.

या ज्ञानकोशाची पहिली आवृत्ती १७६८ मध्ये प्रकाशित झाली. १९६८ मध्ये या ज्ञानकोशाला २०० वर्षे पूर्ण झाली. चौदावी आवृत्ती 'एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका' या शीर्षकाखाली प्रकाशित झाली. पंधरावी आवृत्ती १९७४ मध्ये 'द न्यू एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका' या शीर्षकाखाली प्रकाशित झाली. याची रचना अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असल्याने हा इतर ज्ञानकोशांहून वेगळा ठरतो. यातील माहिती प्रत्येक विषयातील तज्ज्ञ व्यक्तींनी लिहिलेली आहे. याची १५ वी आवृत्ती २०१० मध्ये प्रकाशित झाली. ती ३२ खंडांत आहे. एकूण पृष्ठे ३२,००० आहेत.

या ज्ञानकोशाचे चार भागात विभाजन केले आहे. ते पुढीलप्रमाणे :

मायक्रोपीडिया – खंड १ ते १२

मॅक्रोपीडिया – खंड १३ ते २९

निर्देश – २ खंड (i) A-K (ii) L-Z

प्रोपीडिया : आऊटलाईन ऑफ नॉलेज – १ खंड

मायक्रोपीडिया : या भागात विविध विषयांवर थोडक्यात माहिती दिलेली आहे. हव्या असलेल्या माहिती संदर्भात जास्त माहिती हवी असल्यास मॅक्रोपीडियाचा संदर्भ दिलेला असतो. संबंधित खंड क्रमांक, रकाना क्रमांक, पृष्ठावरील कोणत्या भागात माहिती दिली आहे त्याचा संदर्भ दिलेला असतो.

मॅक्रोपीडिया : या भागात विविध विषयांवर सखोल माहिती वर्णन केलेली आहे. मायक्रोपीडियामध्ये आलेल्या विविध विषयांचे परस्पर पूरक संदर्भही दिलेले आहेत. या भागात दिलेली माहिती अतिशय विद्‌वत्तापूर्ण आहे.

निर्देश खंड : इंग्रजी वर्णानुक्रमाने सखोल निर्देश दिलेला आहे. तो सापेक्ष निर्देश आहे.

प्रोपीडिया : यामध्ये ज्ञानविश्वाचे वर्गीकरण दिलेले आहे. या ज्ञानकोशातील समाविष्ट मुख्य विषय व उपविषयांचे विभाजन व वर्गीकरण केलेले आहे.

**(ii) मॅकग्रॉ-हिल एनसायक्लोपीडिया ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी –** ११ वी आवृत्ती, २०१२, २० खंड, प्रकाशक : मॅकग्रॉ-हिल बुक कंपनी, न्यूयॉर्क.

हा ज्ञानकोश विशेषतः विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील विषयांकरिता निर्माण केला आहे. या आवृत्तीचे प्रकाशन

मॅकग्रॉ-हिल एज्युकेशन या प्रकाशन संस्थेने केले आहे. या ज्ञानकोशात प्रामुख्याने जैवविज्ञान, भौतिकशास्त्रे, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या विषयांशी संबंधित संज्ञा व संकल्पनांविषयीची माहिती समाविष्ट केली आहे.

यामध्ये विश्लेषणात्मक निर्देश व सापेक्ष निर्देश दिलेले आहेत. सुधारित आवृत्त्या नियमितपणे प्रकाशित होत असतात. माहिती घटकांची रचना मुख्य विषयांतर्गत उपविषयांची माहिती देऊन अनुवर्णक्रमानुसार दिलेली आहे.

**(iii) मराठी विश्वकोश :** ६ वी आवृत्ती, संपादक : दिलीप करंबेळकर, प्रकाशक : प्राज्ञ पाठशाळा, वाई, २०१५.

या ज्ञानकोशाची ऑनलाईन आवृत्ती प्रकाशित होत आहे. ती १९ खंडांत प्रकाशित झाली आहे. ती इंटरनेटवर उपलब्ध आहे. अद्यापि राहिलेल्या खंडांचे काम चालू आहे. याचे पहिले संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आहेत. या ज्ञानकोशाच्या कार्याची सुरुवात १९६० मध्ये झाली. याची पहिली आवृत्ती १९७६ मध्ये प्रकाशित झाली. तसेच, २०१० मध्ये हा ज्ञानकोश १८ खंडात प्रकाशित झाला. ही याची छापील स्वरूपातील शेवटची आवृत्ती होय.

२०११ पासून या ज्ञानकोशाची केवळ डिजिटल (ऑनलाईन) आवृत्ती प्रकाशित करण्यात येत आहे. ती इंटरनेटवर मोफत उपलब्ध आहे. आजपावेतो एकूण एकोणीस खंड प्रकाशित झाले आहेत. (URL : vishwakosh.marathi.gov.in)

**(iv) एनसायक्लोपीडिया ऑफ लायब्ररी अँड इन्फरमेशन सायन्स :** १ ली आवृत्ती, १-७३, १९६८-२००३ या दरम्यान प्रकाशित झाली. संपादक : ॲलन केंट, हॅरॉल्ड लँकर आणि जे.ई.डेली, प्रकाशक : मार्सेल डेकर, न्यूयॉर्क.

ॲलन केंट व इतर संपादकांनी या ज्ञानकोशाची निर्मिती ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयासाठी केली. ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील लेख, जगातील सर्व देशातील ग्रंथालये, ग्रंथालय शास्त्राचा इतिहास व विकास, ग्रंथालयीन सेवा, उपकरणे, ग्रंथप्रकाशन शास्त्र, ग्रंथालय शास्त्रातील नामवंत व्यक्ती, ग्रंथालयाचे प्रकार इत्यादीविषयी माहिती यामध्ये समाविष्ट केली आहे. एकूण ४७ (मूळ खंड) प्रकाशित झालेले असून खंड ४६ व ४७ मध्ये लेखक व विषय निर्देश दिलेले आहेत. खंड ४७ नंतर माहिती अद्ययावत करण्यासाठी (नवीन विषय) दरवर्षी वार्षिक पुरवणी खंड प्रकाशित केला जाऊ लागला. इ.स.२००२ पर्यंत ७२ वा खंड प्रकाशित झाला. त्यानंतर प्रकाशन थांबवले गेले.

**(३) वार्षिके :** या संदर्भ ग्रंथात साधारणपणे वर्षातील महत्त्वाच्या घटनांची माहिती कालक्रमाने नमूद केलेली असते. तसेच एका वर्षातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक घटनांचा समावेश केलेला असतो. विविध ज्ञान क्षेत्रातील घडामोडी व अभ्यास याविषयी माहिती समाविष्ट केलेली असते. विविध क्षेत्रातील मृत अथवा जिवंत व्यक्तींची चरित्रे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटनांची माहिती, खेळातील पारितोषिके, लोकसंख्या इत्यादी माहितीचा समावेश असतो. काही महत्त्वाच्या वार्षिकांविषयीची माहिती पुढे वर्णन कलेली आहे.

**(i) इंडिया : ए रेफरन्स ॲन्युअल :** २०१९ (६३ वी आ.) प्रकाशक : संचालक, पब्लिकेशन डिविजन मिनिस्टरी ऑफ इन्फरमेशन अँड ब्रॉडकास्टिंग, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, न्यू दिल्ली.

देशाने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा वार्षिक आढावा या वार्षिकात घेतला जातो. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत केलेल्या विकासाविषयीची सर्व माहिती या वार्षिकात दिली जाते. तसेच भारताचे भौगोलिक राजकारण, संरक्षण, शिक्षण, सांस्कृतिक व कुटुंब कल्याण योजना, दळणवळण, गृहनिर्माण योजना, न्यायव्यवस्था, देशाचे आंतरराष्ट्रीय धोरण, भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ सर्व घटकांची व्यापक माहिती दिलेली असते. शासकीय विभागांची सांख्यिक माहिती यामध्ये प्रामुख्याने समाविष्ट केली जाते.

**(ii) युरोपा वर्ल्ड इयरबुक :** ५५ वी आवृत्ती, प्रकाशक : युरोपा पब्लिकेशन्स, खंड-३, २०१४.

या वार्षिकामध्ये २५० देशांविषयीची माहिती समाविष्ट केलेली आहे. ही माहिती विश्लेषणात्मक व सांख्यिकी स्वरूपात, तसेच डिरेक्टरी डेटासुद्‌धा यात समाविष्ट केलेला आहे. पहिल्या खंडात २००० पेक्षा जास्त संघटनांविषयीची माहिती दिलेली आहे. जसे युनो, युनेस्को, युरोपियन नेशन्स इत्यादी. पहिल्या खंडात अफगाणिस्तान ते इक्वेटेरियल गिनिया, दुसऱ्या खंडात इरिट्रिया टू निकाराग्वा, तर तिसऱ्या खंडात नायजेरिया ते झिंबाब्वे अशा पद्‌धतीने इंग्रजी वर्णांच्या अनुवर्णक्रमानुसार माहिती दिलेली आहे. तीनही खंडांतून सर्व देशांविषयीची माहिती देताना भौगोलिक स्थान, हवामान, भाषा, राष्ट्रध्वज, राजधानी, शासन व्यवस्था, संरक्षण व्यवस्था, अर्थव्यवस्था, समाज कल्याणाच्या योजना, शिक्षण व्यवस्था, लोकसंख्या, शेती, उद्योगधंदे, व्यवहारातील चलन, न्यायव्यवस्था, मंत्रिमंडळ, राजकीय पक्ष, दूतावासांचे पत्ते, वृत्तपत्रे, आर्थिक संस्था इत्यादी बाबींची माहिती समाविष्ट केली जाते.

**(४) चरित्रकोश :** या संदर्भग्रंथाचे महत्त्व म्हणजे समाजाच्या विविध क्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तींविषयीची माहिती नव्या पिढीस देण्याकरिता असे संदर्भ ग्रंथ प्रकाशित केले जातात. व्यक्तीच्या चरित्रात्मक माहितीतून त्यांच्या कालखंडातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर ऐतिहासिक माहिती यातून प्राप्त होते. अशा कारणामुळे असे संदर्भ ग्रंथ हे महत्त्वपूर्ण ठरतात. व्यक्तींची माहिती, जन्मतिथी, ऐतिहासिक घटनांशी संबंध असलेल्या व्यक्ती, त्यांच्या संदर्भातील शैक्षणिक, जन्म व मृत्यू दिनांक, अशा प्रकारची माहिती या संदर्भ ग्रंथांतून उपलब्ध होते. काही चरित्रात्मक कोशांची माहिती खाली वर्णन केली आहे.

**(i) भारतवर्षीय चरित्र कोश :** ३ खंड, संपादक : सिद्‌धेश्वरशास्त्री चित्राव, १९३२ साली १ ली आवृत्ती प्रकाशित झाली. या कोशाचे तीन खंडांचे विभाजन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**खंड–१ : प्राचीन खंड** (भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश – प्राचीन काळ)

**खंड–२ : मध्ययुगीन खंड** (भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश : मध्ययुगीन काळ ख्रिस्तपूर्व ३२१ ते इ.१८१८)

**खंड–३ : भारतवर्षीय अर्वाचीन चरित्र कोश :** १८१८–१९४५

खंड–१ : या खंडात भारतातील प्राचीन वाङ्‌मय जसे, श्रुती, स्मृती, पुराणे, सूत्रे, वेदांतील बारा हजार व्यक्तींच्या चरित्रांचा समावेश यात करण्यात आला आहे. तसेच सर्व देवी–देवता, गंधर्व–किन्नर, अप्सरा, राजे, चाणक्यासारखे राजनीतिज्ञ, गणितज्ञ, वैज्ञानिक अशा व्यक्तींची माहिती दिलेली आहे.

खंड–२ : दुसऱ्या खंडामध्ये चंद्रगुप्त मौर्य ते पेशव्यांपर्यंतच्या कालखंडातील व्यक्तींची चरित्रे समाविष्ट केलेली आहेत.

खंड–३ : विविध क्षेत्रातील नावाजलेल्या व्यक्तींची चरित्रे यात समाविष्ट आहेत. जसे महात्मा गांधी, राजा राममोहन रॉय, धोंडो केशव कर्वे इत्यादी या खंडात व्यक्तींची पूर्ण नाव, जन्म व मृत्यू दिनांक, शिक्षण, कार्य, विशेष कार्य, ग्रंथलेखन इत्यादीचा समावेश केला आहे.

**(ii) मराठी विश्वचरित्रकोश :** ५ खंड, संपादक : श्रीराम पांडुरंग कामत, प्रकाशक : विश्वचरित्र संशोधन केंद्र, पणजी (गोवा), २०००.

या विश्वचरित्रकोशामध्ये इतिहास, तत्वज्ञान, साहित्य, कला, क्रीडा, वैद्यकशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान, संगीत, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, प्रशासन इत्यादी ज्ञानक्षेत्रात मोलाची कामगिरी केलेल्या ७४० व्यक्तींच्या चरित्रांचा समावेश आहे. माहितीचे सादरीकरण करताना प्रथम आडनाव नंतर आद्याक्षरे अशा पद्‌धतीने नोंदी केल्या आहेत. ज्या व्यक्ती टोपणनावाने परिचित आहेत. अशा व्यक्तींच्या टोपणनावानेही नोंदी केलेल्या आहेत. व्यक्तींच्या चरित्रांची रचना मराठी देवनागरी वर्णानुक्रमाने केलेली आहे.

**(iii) हूज हू ऑफ इंडियन रायटर्स :** २ खंड, संपादक : के.सी.दत्ता, २०००, प्रकाशक : साहित्य अकादमी, पुणे.

विसाव्या शतकाच्या शेवटी प्रकाशित झालेल्या या चरित्रकोशाच्या आवृत्तीत भारतातील सर्व भाषेतील साहित्यिकांची नोंद घेण्यात आली आहे. या चरित्रकोशात एकूण ८००० पेक्षा जास्त लेखकांच्या (२२ भाषेतील) नोंदी आहेत.

जे साहित्यिक हयात (जिवंत) आहेत अशाच साहित्यिकांची माहिती यात मिळते. ही माहिती-लेखकाचे नाव, शीर्षक, पदवी, टोपणनाव (असल्यास), जन्मदिनांक व स्थान, मातृभाषा, शिक्षण, नोकरीतील पद इत्यादी माहिती दिलेली आहे. किमान सहा ग्रंथ लेखकाने लिहिलेले असावेत असा निकष आहे, पत्रव्यवहाराचा पत्ता इत्यादी माहितीचा समावेश नोंदीत केलेला आहे. यामधील माहिती अधिकृत समजली जाते. कारण, ती लेखकाने स्वतः दिलेली असते.

**(५) भौगोलिक संदर्भ ग्रंथ :** आधुनिक काळात पर्यटन हा अनेकांचा आवडता छंद झाला आहे. त्यामुळे 'पर्यटन' एक व्यवसाय म्हणून वृद्धिंगत झाला आहे. पर्यटनाच्या दृष्टीने, ऐतिहासिक अभ्यासाच्या दृष्टीने अथवा उद्योगधंद्याची सुरुवात करण्याच्या दृष्टीने तसेच नैसिर्गक स्थळे, अभयारण्ये इत्यादीविषयीच्या माहितीकरिता स्थलवर्णन कोश अथवा भौगोलिक संदर्भग्रंथ महत्त्वपूर्ण ठरतात. काही महत्त्वपूर्ण भौगोलिक संदर्भ ग्रंथांची माहिती यापुढे वर्णन केलेली आहे.

**(i) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर्स :** महाराष्ट्र शासनाचे एक स्वतंत्र संचालनालय असून त्यास संचालनालय, महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर्स डिपार्टमेंट असे नाव दिलेले आहे. हे संचालनालय सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखाली कार्य करते. हा विभाग महाराष्ट्र राज्य व प्रत्येक जिल्ह्याचे स्वतंत्र गॅझेटियर मराठी व इंग्रजी भाषेतून प्रकाशित करतो. जसे पुणे जिल्हा गॅझेटियर, उस्मानाबाद जिल्हा गॅझेटियर, औरंगाबाद जिल्हा गॅझेटियर इत्यादी हल्ली जिल्हा गॅझेटियर्सच्या इलेक्ट्रॉनिक आवृत्याही प्रकाशित केल्या जात आहेत.

या गॅझेटियर्समध्ये जिल्ह्याची तपशीलवार माहिती दिलेली असते. हा एक प्रकारचा भौगोलिक माहितीचा निर्देश असलेला कोश आहे. यामध्ये जिल्ह्यामधील सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक बाबींविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच जिल्ह्याचे क्षेत्रफळ, सीमा, डोंगर, पर्वतरांगा, नद्या, तळी, तेथील हवामान, पर्जन्यमान, तापमान, शेतीची उत्पादने, उद्योगधंदे, जंगले, जैविक संपदा, सामाजिक चालीरिती इत्यादी. या गॅझेटियर्समधील माहिती जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, शासकीय विभागामार्फत संकलित केली जाते.

हा अतिशय महत्वपूर्ण व माहितीपूर्ण असा संदर्भ ग्रंथ आहे. पर्यटनाच्या दृष्टीनेही तो महत्वपूर्ण ठरतो.

**(६) सूचीविषयक साधने (Bibliographical Resourses) :** वाचन साधनांसंदर्भात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता सूचीविषयक संदर्भ ग्रथांची संदर्भसेवा देताना आवश्यकता असते. काही सूचीविषयक संदर्भ ग्रथांची माहिती/वर्णन खाली दिलेली आहे.

**(i) इंडियन नॅशनल बिब्लियोग्राफी (आयएनबी) :** प्रकाशक : नॅशनल लायब्ररी, कोलकाता.

नॅशनल लायब्ररीची, सेंट्रल रेफरन्स लायब्ररी, कोलकाता ही सूची प्रकाशित करते भारतातील १४ भाषांमध्ये (इंग्रजीत) प्रकाशित झालेल्या व कॉपीराईट ॲक्ट अंतर्गत नॅशनल लायब्ररीस प्राप्त झालेल्या ग्रथांची ही सूची होय. ही वर्गीकृत रचना असलेली ग्रथांची सूची होय. या सूचीत नकाशे, संगीतविषयक साधने, नियतकालिके, क्रमिक ग्रंथ, इत्यादी वाचन साधने समाविष्ट केली जातात.

वाचन साधनांविषयी माहिती देताना ग्रंथाचा वर्गांक, लेखकाचे पूर्ण नाव, प्रकाशन स्थळ, प्रकाशक, प्रकाशन वर्ष, ग्रंथाच्या बांधणीचा प्रकार, किंमत, ग्रंथ मालेत प्रकाशित झाला असल्यास त्या मालेविषयीची (series) माहिती दिलेली असते. ह्यात ग्रंथांविषयीची दिलेली माहिती अचूक, व्यापक व अधिकृत समजली जाते.

आयएनबीचे पुढील तीन विभाग आहेत. वर्गीकृत विभाग, लेखक व ग्रंथशीर्षक निर्देश विभाग व विषय निर्देश

**(७) डिरेक्टरी (Directory) :** डिरेक्टरी या संदर्भ ग्रंथात संस्थांविषयीची माहिती समाविष्ट केलेली

असते. जसे, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, संशोधन करणाऱ्या संस्था आर्थिक व्यवहारांशी संबंधित संस्था, व्यावसायिक संस्था, सामाजिक संस्था व स्वयंसेवी संस्था इत्यादी.

**(i) युनिव्हर्सिटीज हँडबुक – इंडिया :** ३४ वी आवृत्ती, २०१८, प्रकाशक : असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली.

या डिरेक्टरीत भारतातील ५३२ विद्यापीठे, नऊ असोसिएट मेंबर युनिव्हर्सिटीज यांची माहिती समाविष्ट केली आहे. या डिरेक्टरीमध्ये पुढील स्वरूपाच्या माहितीचा समावेश केला जातो. विद्यापीठाचे अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता संबंधीची माहिती, अभ्यासक्रमाचा कालावधी, अभ्यासक्रमाचा विषय, ग्रंथालये व संशोधन करण्याची सुविधा, पत्रव्यवहाराचा पत्ता, विविध शिष्यवृत्या व फेलोशिप संदर्भातील माहिती, शैक्षणिक वर्ष, विद्याशाखा, विद्याशाखांचे अधिष्ठाता, अध्यापकांची नावे, संलग्न महाविद्यालयांविषयीची माहिती इत्यादी.

या सूचीची इलेक्ट्रॉनिक (सीडी-रॉम) आवृत्ती व इंटरनेटवर ऑनलाईन आवृत्तीही उपलब्ध आहे.

## स्वाध्याय

**शब्दकोश :** पुढील शब्दांचे अर्थ कोणत्या प्रकारच्या संदर्भ साधनांमध्ये उपलब्ध होतील ते लिहा.

(1) Accent (2) Advantage (3) bring (4) original (5) catalogue (6) dinner (7) drought (8) specialise (9) besides (10) knowledge (11) prefactory (12) examine (13) appendix (14) enterprise (15) illustration (16) dominate (17) pseudonym (18) render (19) wax (20) yarn (21) secular (22) radicalism (23) analysis (24) translate (25) populism.

**ज्ञानकोश :** खालील संज्ञा, स्थळे, भूभाग आणि व्यक्ती यांची माहिती कोणत्या ज्ञानकोशात मिळेल ते सांगा. संदर्भ ग्रंथाचे योग्य शीर्षक सांगा.

(१) विल्यम शेक्सपियर (२) पॅसिफिक ओशन (महासागर) (३) अरबी समुद्र (४) ट्रॅजेडी (५) अँग्लो-अमेरिकन कॅटलॉगिंग रूल्स संहिता (code) (६) डॉक्युमेंटेशन (७) कायनेटिक थिअरी (८) बिगबँग थियरी (९) क्वांटम मेकॅनिक्स् (१०) महाबळेश्वर (११) ग्राहक संरक्षण कायदा (१२) न्यूटन व त्याचा सिद्धान्त (१३) वर्ल्ड वॉर-द सेकंड (World War-II) (१४) राजस्थान (१५) ताजमहाल (१६) ताडोबाचे जंगल (१७) खजुराहो (१८) कोलकाता (१९) व्हाइट हाऊस (२०) स्टॅच्यू ऑफ फ्रीडम (२१) नायगरा फॉल (२२) द न्यू एनसायक्लोपिडिया ब्रिटानिकाचे चार भाग कोणते व त्याचे एकूण खंड किती ते सांगा. (२३) मराठी विश्वकोशाचे प्रकाशन स्थळ सांगा. (२४) कॅलिफोर्निया (२५) दसरा सण (२६) संक्रांतीचा सण (२७) गुढी पाडवा (२८) बिब्लियोमेट्रिक्स (२९) लायब्ररी ऑफ काँग्रेस (३०) भारत (३१) युएसए (३२) चीन

**वार्षिके :** खालील विषयांवरील माहिती कोणत्या वार्षिकांमध्ये मिळेल ते सांगा.

(१) ऑस्ट्रेलियन राजदूताचा भारतातील पत्ता (२) भारताची एकूण लोकसंख्या (३) अमेरिकेचे एकूण क्षेत्रफळ व लोकसंख्या (४) रशियाचे राष्ट्रगीत व बोलीभाषा (५) महाराष्ट्रातील अभयारण्ये (६) पुणे जिल्ह्यातील अष्टविनायकाची मंदिरे (७) भारताची अर्थव्यवस्था व चलन (८) औरंगाबाद जिल्ह्यातील लेण्या (९) वेरूळ व अजिंठाविषयीची माहिती (१०) शनिवारवाडा (११) बीबी का मकबरा (१२) लाल किल्ला (१३) भाक्रा-नांगल धरण (१४) जायकवाडी धरण (१५) उजनी धरण (१६) कोयना धरण (१७) भारतातील प्रमुख अभयारण्ये (१८) पेंच व्याघ्रप्रकल्प (१९) राजस्थानमधील किल्ले (२०) ब्रिटनमधील भारतीय राजदूताच्या कार्यालयाचा पत्ता (२१) भारताच्या संरक्षण खात्याविषयीची माहिती (२२) फ्रान्समधील वस्तुसंग्रहालये (२३) भारतातील वस्तुसंग्रहालये (२४) भारतातील ऐतिहासिक स्थळे (२५) उस्मानाबाद

जिल्ह्यातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळे (२६) इजिप्तमधील पिरॅमिडस्

**चरित्रसाधने :** खालील व्यक्तींची चरित्रात्मक माहिती कोणत्या संदर्भ ग्रंथातून मिळेल ते लिहा (सांगा). योग्य शीर्षक व प्रकाशन स्थळ सांगा.

(१) विनोबा भावे (२) सुभाषचंद्र बोस (३) महात्मा गांधी (४) रवींद्रनाथ टागोर (५) प्र.के. अत्रे (६) पु.ल.देशपांडे (७) विश्वास पाटील (८) पं. जवाहरलाल नेहरू (९) विन्स्टन चर्चिल (१०) वास्को-द-गामा (११) स्टॅलिन (१२) माओ-त्से-तुंग (१३) लिओनार्दो -द-विन्सी (१४) अटलबिहारी वाजपेयी (१५) महाराणा प्रताप (१६) पृथ्वीराज चौहान (१७) हेन्री किसिंजर (१८) ॲडॉल्फ हिटलर (१९) मुसोलिनी (२०) ॲरिस्टॉटल (२१) दलाई लामा (२२) राज कपूर (२३) दादासाहेब फाळके (२४) चाणक्य (२५) राजा हरिश्चंद्र (२६) स्टीफन हॉकिन्स

**भौगोलिक साधने :** पुढील स्थळांची माहिती कोणत्या भौगालिक संदर्भ ग्रंथातून प्राप्त होईल ते सांगा. संदर्भ ग्रंथांचे अचूक शीर्षक, प्रकाशक व प्रकाशन स्थळ सांगा.

(१) गंगापूर (औरंगाबाद जिल्ह्यातील) (२) तुळजापूर (३) सोलापूर (४) सासवड (५) सिद्‌धटेक (६) वेरूळ (७) पैठण (८) अजिंठा (अजंता) (९) ताडोबा (१०) नागपूर (११) चंद्रपूर (१२) बुलढाणा (१३) न्यूयॉर्क (१४) वॉशिंग्टन (१५) आग्रा (१६) मॉस्को (१७) वुहान (१८) बिजींग (१९) बँकॉक (२०) टोकियो (२१) कराची (२२) इस्लामाबाद (२३) जम्मू (२४) हिमाचल प्रदेश (२५) डेहराडून (२६) आग्रा (२७) गोवा (२८) रायगड (२९) कोल्हापूर (३०) म्हैसूर (३१) उटी.

**सूचीविषयक संदर्भग्रंथ :** खाली ग्रंथांचे शीर्षक दिलेले असून त्यांचे लेखक, प्रकाशक व प्रकाशन स्थळ याविषयीची माहिती कोणत्या संदर्भ ग्रंथात मिळेल त्या संदर्भ ग्रंथाचे अचूक शीर्षक, व्याप्ती व प्रकाशक इत्यादी माहिती सांगा.

(१) विकार विलसित (२) संगीत सौभद्र (३) हॅम्लेट (४) ऑथेल्लो (५) मृत्युंजय (६) पाणिपत (७) स्वामी (८) श्रीमान योगी (९) छावा (१०) Roses in December (११) ट्रेन टू पाकिस्तान (Train to Pakistan) (१२) लॉर्ड ऑफ द रिंग्ज (१३) मॅकबेथ (Macbeth) (१४) टू स्टेटस् (१५) यु कॅन विन (१६) Cry the beloved country (१७) Calcutta cromosom (१८) १८५७ चे बंड (१९) My fair lady (२०) दीपस्तंभ.

**डिरेक्टरी (निर्देशिका) :** खालील संस्थांची माहिती कोणत्या संदर्भ ग्रंथात मिळेल, त्या संदर्भ ग्रंथाचे शीर्षक, प्रकाशन स्थळ व प्रकाशक यांची अचूक माहिती सांगा.

(१) सावित्रीबाई फुले-पुणे विद्यापीठ (२) भारतातील सीएसआयआरच्या प्रयोगशाळा (३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (४) कोकण कृषी विद्यापीठ (५) केंब्रिज युनिव्हर्सिटी (६) ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी (७) मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (८) चीनमधील विद्यापीठे (९) पुणे येथील महाविद्यालये (१०) शिवाजी विद्यापीठ (११) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (१२) आरोग्यविज्ञान विद्यापीठ, नाशिक (१३) नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (१४) नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ व्हायरॉलॉजी, पुणे (१५) डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (ISRO - इस्रो), बंगलोर (१६) राहुरी कृषी विद्यापीठ (१७) रशियामधील वैद्यकीय विद्यापीठे व महाविद्यालये (१८) नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन, युएसए (१९) जर्मनीमधील संशोधन संस्था (२०) मॅनहॅटन प्रोजेक्ट.

**टीप : स्वाध्यायांकरिता QR कोडवर दिलेल्या इतर संदर्भ साधनांच्या माहितीचाही उपयोग करण्यात यावा. शिक्षकांनी या संदर्भग्रंथांची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.**